मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे न्यायालयात दाखल
पुनरिक्षण अर्जावरील आदेशानुसार कार्यवाही
करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-१/आस्था-३/३३०२१६२/४७५/२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील दोषारोप पत्र क्र.साप्रवि/आस्था३/९९८/२०२१ दिनांक १८/११/२०२१
२. दोषारोपाचे अनुषंगाने आपणाकडील खुलासा दिनांक १४/१२/२०२१
३. इकडील चौकशी व सादरकर्ता अधिकारी नेमणुक आदेश जा.क्र.साप्रवि/आ-३/१०४३/२०२१ दिनांक २८/१२/२०२१
४. सहाय्यक आयुक्त(चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेडील चौकशी अहवाल जा.क्र.विशा-४/खाचौ/सी.आर.९/२०२२ दिनांक २५/०७/२०२२
५. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि/आस्था-३/१५३१६/११८० ११८०/२०२२ दिनांक ०४/१०/२०२२
६. श्री.माने सुनिल तुकाराम, कनिष्ठ सहाय्यक यांचा खुलासा दि १०/११/२०२२
७. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि१/आस्था-३/१५३१६/८३/२०२३ दि १८/०१/२०२३
८. मा अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडील अपिल क्र.२९/२०२३ निकाल दिनांक २६/०४/२०२४
९.कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र जा.क्र. डिईएन-२०२५/प्र.क्र.५७/आस्था-१२ दिनांक २९/०४/२०२६ समवेत म राज्यमंत्री यांचेकडील अपिल आदेश दिनांक २२/०४/२०२६

श्री सुनिल तुकाराम माने, हे कनिष्ठ सहाय्यक या पदावर पंचायत समिती शेवगाव येथे कार्यरत असताना, पंचायत समिती शेवगाव येथे अनाधिकृत गैरहजर असलेने या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ७ च्या आदेशान्वये श्री सुनिल तुकाराम माने, सक्तीने सेवा निवृत्त करणेची शिक्षा करणेत आलेली होती.

श्री सुनिल तुकाराम माने, कनिष्ठ सहाय्यक, यांनी इकडील संदर्भ क्रमांक ७ च्या आदेशा विरुध्द मा. अपर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, यांचेकडेस अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी होवून संदर्भ क्रमांक ८ अन्वये श्री माने यांचे सदरचे अपिल अमान्य करणेत येऊन या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ७ चा आदेश कायम करणेत आला.

उक्त नमुद शिक्षेच्या आदेश व मा. अपर आयुक्तांचे निकालाचे अनुषंगाने श्री.माने यांनी मा. राज्यमंत्री ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांच्या न्यायालयात अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी होवून संदर्भ क्र. ९ चे पत्रान्वये मा. राज्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांच्या न्यायालयाचे निकालपत्र दि २२ एप्रिल २०२६ या कार्यालयास दिनांक १२/०५/२०२६ रोजी प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा

..२

(शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम २१ नुसार पारीत निकालपत्राचे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देणेत आहेत.

१. अपिलार्थी श्री सुनिल तुकाराम माने, कनिष्ठ सहाय्यक यांचे अपील अशंत: मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर याचे दि १८/०१/२०२३ रोजीचे आदेश व अपर विभागीय आयुक्त, नाशिक यांचा दि २६/०४/२०२४ रोजीच्या आदेशामध्ये अंशत: बदल करुन "सक्तीने सेवानिवृत्त करणे" या शिक्षेऐवजी "दोन वेतनवाढी पुढील वेतनावर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रीतीने रोखणे" ही सुधारित शिक्षा लागु करण्यात येत आहे.

३. निंलबन कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ कर्तव्य कालावधी समजणेत यावा.

४. अपीलार्थी यांना मुळ पदावर तात्काळ पुनस्थार्पित करुन ३० दिवसांच्या आत रिक्त पदावर पदस्थापना देण्यात यावी.

तरी वरील मुद्दा क्रमांक ४ नुसार श्री सुनिल तुकाराम माने, सक्तीने सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांना कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) या पदावर ---पं. स. जामखेड--- ------------------------------------------------------- येथे पुन:स्थापित करणेत येत आहे.

श्री सुनिल तुकाराम माने, सक्तीने सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), यांचा सक्तीने सेवानिवृत्त केल्याच्या दिनांकापासून श्री. माने हे हजर होतील या दिनांकापर्यंतचा सेवा बाह्य कालावधीचा निर्णय श्री.माने हजर झालेनंतर घेण्यात यावा.

सदर आदेशाची नोंद श्री सुनिल तुकाराम माने, सक्तीने सेवानिवृत्त कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक 202606090401I3 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 09-06-2026 22:00:11
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. सुनिल तुकाराम माने, सक्तीने सेवानिवृत्त कनि सहा, जि.प.सा.बा उपविभाग नगर

द्वारा व प्रत- उप अभियंता, जि.प.सा.बा उपविभाग नगर

२/- सदरचा आदेश श्री.माने यांना बजावणेत येवून दिनांकित पोहोच आणि सदर आदेशाची नोंद मुळ सेवा पुस्तकात घेणेत येवून नोंद घेतलेल्या मुळ सेवा पुस्तकातील पृष्ठाची छायांकित सत्य प्रत या कार्यालयास उलटटपाली सादर करावी.

प्रत:- गटविकास अधिकारी पंचायत समिती जामखेड......

प्रत:- अवर सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सादर

प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर